# पुणे जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक २०२६-२०२९

(सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये क्रमांक एमएएच/१८२६/पुणे/८१ नुसार नोंदणीकृत)
(बॉम्बे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९६० अन्वये एफ-१९०१/पुणे या क्रमांकाने नोंदणीकृत)
ईमेल : elections@pdcapunecricket.com
संपर्क: ९६११९४६०२०२

प्रती,

३०/०५/२०२६

१) पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सर्व सदस्य

२) पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन कार्यालय

३) पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन मॅनेजिंग कमिटी

पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन, पुणे

**विषय: पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन मॅनेजिंग कमिटी निवडणूक २०२६-२०२९ ...**

महोदय/ महोदया,

माझे नाव अविनाश तुकाराम सणस, असून मी ३८ वर्ष उच्च अधिकारी पदावर शासकीय सेवा केली आहे आणि त्यातील १३ वर्ष निवडणूक आयोगात उपयुक्त या पदावर काम केले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय मा. न्यायमूर्ती लोधा समिती च्या निर्णयानुसार सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि विदर्भ क्रिकेट असोसिएशन यांच्या निवडणूक घेतल्या आहेत. तसेच राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा, २०२५ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनची देखील निवडणूक मार्च- एप्रिल २०२६ मध्ये घेतली आहे.

मला दिनांक ०६/०५/२०२६ रोजीच्या मॅनेजिंग कमिटी सभेच्या ठराव क्रमांक ३ नुसार आणि दिनांक ०७/०५/२०२६ रोजीच्या पत्रानुसार निवडणूक अधिकाऱ्याच्या नियुक्तीचे पत्र मिळाले. दिनांक २०/०५/२०२६ रोजी PDCA कार्यालयत भेट देऊन पदाधिकाऱ्यांशी व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली, मागील निवडणुकीच्या रेकॉर्डचे अवलोकन केले आणि विविध निवडणूक दस्तऐवज सर्व सदस्यांसाठी सोपे व सुलभ होतील असे ड्राफ्ट केले.

सध्याच्या मॅनिजिंग कमिटी चा कालावधी संपला असून तत्काल निवडणूक घेणे आवश्यक आहे. मी आपणास आश्वासित करतो की PDCA Constitution चे तंतोतंत पालन होईल आणि ही निवडणूक निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या पार पडली जाईल. सोबत निवडणूक कार्यक्रम (मराठी आणि इंग्रजी भाषेत) आपल्या माहितीस्तव सादर. कोणाला काही शंका असल्यास वरील email अथवा मोबाइल वर संपर्क करावा. धन्यवाद !

आपला विश्वासू

(अविनाश सणस)
निवडणूक अधिकारी